# रेणू एक अनोखा जीवनसंग्राम - भाग १

रेणुकाला लहानपणापासून झाडाफुलांची आवड! परळच्या त्यांच्या छोट्याशा घरासमोर तिने सुंदर बाग फुलवली होती. ती नुसती फुलझाडे लावत नव्हती, तर तिच्या बागेत कढीपत्ता, कोथिंबीर, पुदिना, भोपळ्याची वेल, टोमॅटोची झुडपेही असत. सर्व शेजाऱ्यांना तिचे कौतुक होते. शाळेत तर पहिला नंबर तिने कायम ठेवला होता. पण बी.एस.सी.लाही ती युनिव्हर्सिटीत पहिली आली. त्यामुळे एम.एस.सी. करायला घरून प्रोत्साहनच मिळाले. एम.एस.सी.ला दुसरा नंबर मिळाला. तरी प्रिन्सिपल तिला पी.एच.डी.साठी रिसर्च करायला सांगत होते. पण आई वडील "आता शिक्षण पुरे, तुझ्या लग्नाचे पाहायचे आहे", म्हणू लागले. ती आई-वडिलांची एकुलती एक मुलगी व तीही उशिरा झालेली. त्यामुळे तिच्या बाबतीतली आपली कर्तव्ये आपल्या हयातीतच पुरी व्हावी अशी त्यांची इच्छा होती. ते तसे काही वयाने म्हातारे झाले नव्हते. पण का कोण जाणे त्यांचा आग्रह होता. रेणूला गव्हर्मेंट इन्स्टिट्यूशन मध्ये रिसर्च असिस्टंट म्हणून पोस्ट मिळाली. ती नोकरीवर खुश होती. मनापासून काम करत होती. कारण काम आवडीचे होते. आई-बाबांचे वरसंशोधन चालू होते. त्यांना लवकरच यश आले.

जयंत आई-वडिलांचा एकुलता एक मुलगा, शिक्षण बी.एस.सी., एम.बी.ए., बँकेत ऑफिसर, दिसायला सर्वसाधारण पण निरोगी, छान, उंच, सशक्त. रेणुका सुंदर. गोरी, लांब केस, सडसडीत बांधा व उच्चविद्याविभूषित. दोन्ही घरचे सर्व एकदम खुश ! लग्न झाले. नोकरी पण चालू राहिली कारण रेणूला रिसर्चच्या कामात खूप इंटरेस्ट होता. सतत मायक्रोस्कोप मध्ये बघून नोटेशन्स करणे. बाह्य दृष्टीला न दिसणाऱ्या अगणित सुंदर गोष्टी दृष्टीस पडत, समजत. निसर्गाची किमया बघून मन अचंबित होई. अजून काहीतरी नवे सापडेल ही आशा संपत नसे. दिवस संपला तरी ध्यानात येत नसे. घरी यायला नेहमी उशीर होई. पण सासूबाई घर पूर्णपणे सांभाळत. त्या तिला आपली सून नव्हे तर मुलगीच मानत. सासरे कधीकधी रागवत व म्हणत वेळेचे बंधन पाळले पाहिजे, पण ते ही काळजीपोटीच! तिला त्यांचा राग नसे. कारण त्यांचे प्रेम ती जाणून होती. जयंत मात्र वेळेवर घरी येई. ती लवकर आली तर खुश ! नसेल आली तर म्हणे येईल आता! शनिवार-रविवार मात्र दोघांचे गुफ्तगू चाले. ते दोन दिवस त्यांना एकमेकांचा सहवास भरभरून हवा असे. घरी कोणी पाहुणे येणार असले तर तो आधीच भेट ठरवून तिला घेऊन बाहेर जाई. कधीकधी लोणावळा, माथेरान पण होई. आईला ते माहीत असे. नव्याने लग्न झालेली तरुण पोरे म्हणून ती त्यांना पाठिंबा देई. सासऱ्यांना ते समजत नसे. घरी पाहुणे येणार व ही दोघे बाहेर जाणार म्हणून आरडाओरड करीत, पण आई सर्व सांभाळून घेत. त्यांनाही गप्प करीत. वर्षभरात दिवस गेले व रेणुकाला मुलगा झाला. सर्वांच्या पसंतीने नाव श्रीधर ठेवले. आई वडील खुश झाले. आईने बाळंतपण निगुतीने केले. सहा महिन्याच्या

बाळाला घेऊन रेणू घरी आली.

त्यानंतर तिच्या आईवडिलांनी त्यांच्या समवयस्क मित्र मंडळींसमवेत तीर्थयात्रा करायचे ठरवले. घर आवरले. तिच्या आईने आपले सर्व दागिने एका डब्यात घालून रेणुकडे आणून दिले. कारण चारधाम यात्रा, उत्तरेकडील अनेक देव देवळे करायची इच्छा त्यांच्या मनात होती. या सर्वाला किती दिवस लागतील ही कल्पना नव्हती. दागिने अंगावर घालून यात्रेला जाणे भीतीचे होते व घरात ठेवणे ही अयोग्य. त्यामुळे ते रेणूकडे सुरक्षित राहतील, असे त्यांना वाटले. रेणूने दागिन्यांचा डबा सासुबाईंकडे दिला. तिचे सर्व दागिने त्यांनी बँकेच्या लॉकरमध्ये ठेवले होते. हे दागिने पण त्यांनी तिथेच ठेवले. बाळंतपणानंतर दोन महिने जास्तीची रजा घेऊन नंतर रेणू ऑफिस मध्ये रुजू झाली. आजी-आजोबा श्रीधरला सांभाळायला समर्थ होते. शिवाय हाताशी सखुबाईही होती. ती त्यांच्याकडे गेली दहा वर्षे कामाला होती. आता तिला जास्ती पगारावर सबंध दिवस ठेवून घेतली. रेणू परत आपल्या आवडीच्या कामात रमली. तिचे बॉस सुब्रह्मण्यम यांनी नवा प्रोजेक्ट हाती घेतला. रेणू त्यांची असिस्टंट होती. आले व मूळा यांचे औषधी मूल्य किती महत्त्वाचे आहे, किती विस्तृत आहे याचा शोध घ्यायला त्यांनी सुरुवात केली. रेणूचे मुख्य सुब्रह्मण्यम तिच्या कामावर खूष होते. दोन्ही गोष्टींवर साधारण दोन वर्षे अविरत काम करून त्यांनी एक प्रोजेक्ट सादर केला. त्यात आले व मुळा यांचा औषधी उपयोग किती निरनिराळ्या विविध प्रकारे होतो व त्यापासून देशाच्या औषधी उत्पादनाला किती फायदा होईल, हे व्यवस्थितपणे मांडले. पण मुळा व आले आपल्या स्वयंपाकात नेहमीच वापरले जाते व खाण्यात येते, त्याबद्दल संशोधन ते काय करायचे; अशा विचाराने भारतात या प्रोजेक्टला कोणी विचारले नाही. पण अमेरिकेतील कॅलिफोर्निया स्टेट मधील एका रिसर्च सेंटरने तो प्रोजेक्ट व त्यावरचा पेपर वाचला, अभ्यासला व सुब्रह्मण्यम  व त्यांची मुख्य असिस्टंट रेणुका यांना तेथे बोलावून घेतले. कारण प्रबंधात रेणू अभ्यासू सहकारी असा उल्लेख आदरपूर्वक केला होता. तिथे साधारण दोन वर्षे काम करावे लागेल असा अंदाज होता. रेणूला रिसर्च करण्याची आवड होती व सुब्रह्मण्यमना देखील तिच्या मदतीची गरज होती. पण रेणू जाणार कशी?   श्रीधर नुकताच चार वर्षांचा शाळेत जाऊ लागला होता. त्याचे सर्व आजी-आजोबा बघत. पण ती आई होती. तिला बाहेरच्या देशात विशेषत: अमेरिकेला जायची आवड होती हे खरे, पण जयंतही बरोबर आला तरच हे सर्व शक्य होते, पण जयंतला मनवायचे कसे? ती त्याला कधीपासून सांगत होती, "तुझ्याकडे एम.बी.ए.ची डिग्री आहे. एवढा कामाचा अनुभव आहे. तुला अमेरिकेत चांगली ऑफर मिळेल." पण तो आहे त्यात खुश होता. आई-वडील व आपली फॅमिली असे त्याचे छोटेसेच विश्व होते. तरीही रेणूने घरी येऊन ही बातमी सांगितली. तिने जयंतला परोपरीने सांगितले, तिथेही तुझी बँक आहे. तेव्हा बँकेतर्फे तिथे बदली करून घे. पण त्याला ते पटले नाही. नेहमीच्या वर्तुळाबाहेर जायची इर्षाच त्याला नव्हती. तो म्हणाला, दोन वर्षांचा तर प्रश्न आहे. तुला जायचे तर जा. मी व आई बाबा श्रीधरला सांभाळू. तिच्या सासू-सासऱ्यांनीही तिला प्रोत्साहनच दिले. मध्यंतरी एक वाईट गोष्ट घडली होती. तिचे आई वडील

व त्यांचे मित्र मंडळ ज्या बसने अमरनाथला जात होते, ती दरीत कोसळून मोठा अपघात झाला. बस मधले सर्व यात्रेकरू दरीत कोसळून कैलासवासी झाले... त्यांचा माग सुद्धा लागला नाही. रेणूला भाऊ-बहीण कोणीच नव्हते. तिच्या आई-वडिलांचा त्यावेळचा प्रेमविवाह. उभयतांच्या घरून निकराचा विरोध, त्यामुळे त्यांचा कोणत्याच नातेवाईकांशी संबंध नव्हता. त्यांचे मित्रमंडळ हेच नातेवाईक. त्यामुळे आता रेणू एकटी पडली. अशावेळी तिच्या सासू-सासऱ्यांनी तिला सर्वतोपरी संभाळले. सासूबाईंनी आईची माया दिली. तर सासरे तिचे दुःख हलके करण्याचा तऱ्हे-तऱ्हेने प्रयत्न करीत. तिने जयंतच्या मदतीने तिच्या माहेरच्या घराची व्यवस्था लावली. आई वडिलांच्या स्मृतीखातीर तिने त्या घरातील फर्निचरसहित एका वृद्धाश्रमाला दान केले. तिची ही औदार्यपूर्ण सामाजिक जाणीव पाहून सासूबाईंना कौतुक वाटले. आता तिला तिच्या हुशारीवर शिष्यवृत्ती मिळवून अमेरिकेला जायची संधी मिळत असताना 'जाऊ नको' असे म्हणून तिला दुखावणे, निराश करणे त्यांना पटले नाही. त्यांना मुलगी नव्हती. रेणू त्यांना सून नव्हे, मुलगीच वाटे. तिचे नम्र मायेत वागणे, त्यांच्याशी आईच्या नात्याने मोकळेपणी बोलणे, त्यांना नेहमी सुखवीत असे. त्यांनी श्रीधरची जबाबदारी आनंदाने घेतली. वर जयंतालाही म्हणाल्या, "तू पण तिकडे जायचा प्रयत्न कर. आमची काळजी करू नकोस. तू गेलास तर आम्ही पण येऊ. आम्हालाही अमेरिका बघता येईल”. पण जयंतला ते काही पटत नव्हते. रुटीनच्या बाहेर जाऊन काहीतरी धडपड करावी अशी त्याची प्रवृत्तीच नव्हती. त्याने रेणूला जायला आडकाठी केली नाही. पण आपण जायला तयार झाला नाही. त्याच्या मनातच नव्हते हे खरे.

रेणू अमेरिकेला पोहोचली. सुरुवातीला दोन महिने त्यांची राहण्याची व्यवस्था कंपनीतर्फे झाली. नंतर त्यांना स्वतःचे घर बघणे आवश्यक होते. कॅलिफोर्निया स्टेटच्या एका कोपऱ्यात हे गाव होते. सभोवार डोंगराळ भाग, भरपूर शेती व मध्ये हे छोटेसे गाव. गावाचे नाव होते 'कॅली'. तिथे मुख्य व्यवसाय शेतीचा होता. अनेक तऱ्हेच्या भाज्या, फळे, गहू, मका इत्यादीचे उत्पादन होत असे. त्यामुळे इथे रिसर्च सेंटर उघडून नवीन नवीन प्रयोग केले जात. त्या योगाने धान्योत्पादन व त्या अनुषंगाने इतर उत्पादने भरपूर प्रमाणात काढायला मदत होई. रेणुकाला गाव आवडले. तिच्याबरोबर काम करणाऱ्या मिलीने व तिने मिळून एक छोटा बंगला भाड्याने घेतला. दोघींनी डिपॉझिट अर्धे-अर्धे भरले व भाडे पण तसेच वाटून घेतले. मिलीचा बिनधास्त, मोकळा स्वभाव रेणूला आवडला. रेणूची शांत प्रवृत्ती तिला मानवली. दोघांची चटकन मैत्री जमली. आता तर दोघी एकत्र राहू लागल्या. दोघींच्या दोन मोठ्या बेडरूम होत्या. किचन व ड्रॉइंग रूम कॉमन होती. वॉशिंगमशीन, ड्रायर कॉमन. सर्व सोयीस्कर होते. त्या बंगल्याची मालकीण वयस्क अमेरिकन बाई होती. एकटीच दुसऱ्या बंगल्यात राहत होती. तिला या दोघी आवडल्या व त्यांच्यात मैत्रीचे नाते जुळले. रेणुकाचा एकटेपणा त्यामुळे कमी झाला. हळूहळू तिथे रूळू लागली. दर शनिवारी घरी फोन करून सर्वांची खुशाली, आपली खुशाली, इतर गप्पा हे सर्व चालू असे. श्रीधरची प्रगतीही समजे. दरवेळी जयंतला येण्याचा आग्रह होई. अशी दोन वर्षे कधीच संपली. सुब्रह्मण्यम वर्षभरातच दुसरीकडे गेले. व त्यांच्या जागी मि. विल्यम

नावाचे तरुण शास्त्रज्ञ आले.

विल्यम अतिशय हुशार, उमदे, तरुण शास्त्रज्ञ होते. त्यांची कामाची शिस्त कडक होती. मिली सकट सगळ्या मुली त्यांच्या मैत्रीसाठी हपापलेल्या असत. वीकेंडला त्याने आपल्याला बोलवावे असे त्यांना वाटे. पण त्याचे काम व रिसर्च यापुढे त्याला काहीच सुचत नसे. ते शनिवार रविवारी सुद्धा काही वेळ काम करीत असत. अशावेळी रेणुकाच त्यांना मदतीला मिळे. कारण तिला इथे कुणाचे पाश नव्हते आणि तिने  इथे कुणाशी संबंध वाढवलेच नव्हते. मिलीचा शनिवार रविवार, शुक्रवारपासून आखलेला असे. घरी एकटे बसण्यापेक्षा रेणू आपले काम करीत बसे. कारण हे काम तिची पॅशन, आवड होती. रात्री घरी आल्यावर घरच्यांशी, सासूबाई, सासरे, जयंत व श्रीधरचे चिमणे बोल ऐकले की तिला पुढच्या आठवड्याचे टॉनिक मिळे. ती तिच्या कामात अडकत राहिली व ते सोडून तिला जाता येईना. ती परत परत जयंतला आर्जवे करी पण तो मनावर घेईना. पण हल्ली जयंतचा तिच्याशी बोलण्यातला इंटरेस्ट कमी झाला आहे, असे तिला जाणवू लागले. आपण आता लवकर आपले काम आटपून भारतात परतले पाहिजे असे तिने मनाशी ठरवले. तो आपल्यावर रुसला आहे. त्याला तिथे जाऊनच मनवायला पाहिजे, असे तिच्या मनाने घेतले. पण हातातले काम संपतच नव्हते. त्यात ती अडकत गेली. रजा घेऊन भारतात जायचे ठरवले, पण तेही कसेच जमेना. नवीन नवीन आव्हाने समोर येत गेली व अनवधानाने ती त्यांना तोंड देत पेलत राहिली.

एकदा एक शेतकरी त्यांच्या कंपनीत आला. त्याचे शेत त्यांच्या केली गावाशेजारीच होते. तो डॉ. विल्यमना म्हणाला, “मी माझ्या शेतात सफरचंदाची झाडे लावली. झाडे चांगली वाढली. त्यांना छान फळे आली. पण ती सगळी कडू व काही दिवसांनी झाडे वाळून गेली. मी दोन-तीन वेळा हा प्रयोग केला. शेत चांगले नांगरले. अगोदरच्या झाडांचा कचरा पूर्ण झाडून टाकला. पण परत तसेच झाले. आता काय करावे समजत नाही”. डॉ. विल्यम त्याच्याबरोबर त्याच्या शेतावर गेले. बरोबर रेणूही होती. त्यांनी आजूबाजूचे, शेताचे, वातावरणाचेही निरीक्षण केले. शेतातल्या मातीचे, वेगवेगळ्या ठिकाणचे नमुने घेतले. पाण्याच्या पंपातून येणाऱ्या पाण्याचे नमुने घेतले. विल्यम व रेणू यांनी आपल्या प्रयोगशाळेत या सर्व नमुन्यांचा नीट अभ्यास केला. त्यात त्यांना काही विचित्र जंतू आढळले. ते जंतू मुळांना दूषित करीत व त्यामुळे फळे दूषित होत आणि नंतर झाड पण मरे. या जंतूचा नाश होण्यासाठी, त्यांनी त्यावर औषध शोधले. सुदैवाने तो प्रयोग यशस्वी झाला. त्यांनी त्या जंतुनाशकाचे सोल्युशन तयार केले व ते त्या शेतकऱ्याला त्याच्या शेतात शिंपडायला सांगितले. ते शिंपडल्यावर शेत नांगरायचे. त्याला थोडे पाणी द्यायचे. नंतर परत महिन्याभराने ते पाणी सुकल्यावर परत तसेच करायचे, असा सहा महिन्याचा कोर्स करायला सांगितला. त्यानंतर शेतात एका बाजूला सफरचंद, दुसरीकडे पीच, थोड्या भागात गहू व थोड्या भागात मका असे पेरायला सांगितले. चार महिन्याने त्याचे शेत हिरवेगार होऊन फळांनी लगडलेले. गहू, मका यांची कणसे डोलू लागली. या वेळी त्याची

सर्व पिके चांगली आली. सर्व जातीची फळे, धान्य यांचे नमुने त्याने रेणूकडे परीक्षणासाठी आणून दिले. प्रयोगशाळेत तपासणीनंतर सर्व गोष्टी १०१% उत्तम निघाल्या. त्या शेतकऱ्याला खूप आनंद झाला. तो म्हणाला, “ताई, तुम्ही सांगितल्याप्रमाणे सहा महिने औषध फवारणी संपल्यावर शेणखत पण मी शेतात पसरले होते. ही रेणूची खास सूचना होती व ती त्याने पाळली, याचा रेणूला आनंद झाला. ती म्हणाली, “ही खास भारतीय पद्धत पूर्वापार चालत आलेली आहे. हे शेणखत म्हणजे स्वस्त आणि मस्त असते हे खरे”. विल्यम व रेणू दोघांनाही आपल्या कामाला यश मिळाल्याचा आनंद झाला. नंतर रेणूने त्याला सांगितले की नेहमी एकाच तऱ्हेचे पीक न घेता त्या जमिनीत वेगळी पिके वेगवेगळ्या वेळी घ्यावी. त्यामुळे जमिनीचा पोत सुधारतो. त्याने तसे केले. त्याला रेणूचे सांगणे पटले. त्याने रेणूला आपली बहीणच मानले आणि कायम तिच्याकडे शेतातला मेवा आणून देऊ लागला. ही गोष्ट सासूबाईंना सांगितल्यावर त्यांना खूप मजा वाटली व रेणूच्या हुशारीचा अभिमान वाटला. त्यांचे मन भरून आले. डॉ. विल्यमनाही रेणूचे काम, तिची कामातील आत्मीयता, दुसऱ्यासाठी त्रास घेऊन मनापासून काम करण्याची पद्धत फार भावली. डॉ. विल्यमना नासाकडून फ्लोरिडाला बोलावणे आले. ते जाणार, म्हणून सर्वांनी त्यांना समारंभपूर्वक निरोप द्यायचे ठरवले. पण त्यांनी ते नाकारले. ते म्हणाले, “माझ्या कामात तुम्ही मला मनापासून साहाय्य केले ते मी कधी विसरणार नाही. समारंभाची मला हौस नाही. परस्परात आपलेपणाचे नाते असणे महत्त्वाचे”. जायच्या दिवशी रेणूला त्यांनी आपल्याबरोबर लंचला बोलवले. नेहमी एकत्र काम करत असल्याने रेणूला त्यात विशेष वाटले नाही. ती त्यांच्याबरोबर लंचला गेली. तिथे त्यांनी तिला लग्नाची मागणी घातली. रेणू म्हणाली, “डॉक्टर मला तुमच्याबद्दल खूप आदर आहे. तुमची ही ऑफर म्हणजे कुठल्याही मुलीला हवीहवीशी वाटेल. तुमच्यासारखा जीवनसाथी मिळायला भाग्य लागते, पण माझे लग्न झाले आहे. माझे पती व मुलगा इंडियाला आहेत. मला तिथे लवकर जायचे आहे. माझ्या रिसर्चच्या प्रेमाने मी इथे अडकले आहे. मी तुम्हाला हो म्हणू शकत नाही. तुम्ही त्याबद्दल अपमानित किंवा वाईट वाटून घेऊ नका." विल्यमना वाईट जरूर वाटले. पण ते म्हणाले, “तू मॅरीड आहेस, असे मला वाटले नाही. सॉरी!” लवकरच विल्यमच्या जागी नवे सायंटिस्ट आले व रेणूवर परत नवी जबाबदारी आली. परत ती अडकली. भारतात जायचे परत लांबले.

(क्रमशः)

**-- © सौ. नलिनी करंडे**